**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 10-05-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये उमरेड ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-05-10 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-05-11 | 2024-05-12 | 2024-05-13 | 2024-05-14 | 2024-05-15 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 3.3 | 2.5 | 2.9 | 7.8 | 2.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 40.0 | 41.5 | 41.7 | 40.0 | 40.1 |
| किमान तापमान (अं.से) | 24.5 | 25.7 | 25.8 | 24.7 | 24.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 65 | 61 | 67 | 70 | 64 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 33 | 35 | 38 | 40 | 33 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 8 | 9 | 11 | 12 | 8 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 237 | 259 | 314 | 157 | 146 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 6 | 7 | 7 | 5 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक११ ते १५ मे २०२४ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक ११, १२, १३, १४ व १५ मे २०२४ रोजी खूप हलक्या ते हलक्या/मध्यमस्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक ११व १२ मे २०२४ रोजी वादळी वाऱ्यासह (३० ते ४० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • दिनांक१४ मे २०२४ रोजी वादळी वाऱ्यासह (४० ते ५० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाटहोण्याची शक्यतावर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ४८ तासामध्ये कमाल तापमानात२ ते ४ अंश सेल्सिअसने वाढ होईल व त्यानंतर फारसा बदल होणार नाही. • पुढील ५ दिवसांत विदर्भात किमान तापमानात फारसा बदल होणार नाही.

## कृषि सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता उन्हाळी मुग, तीळ इत्यादी पिकाची कापणी व मळणी पुढील ४८ तासामध्ये उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. • पावसाचा अंदाज लक्षात घेता काढणी मळणी केलेला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवावा. कापणी केलेला उन्हाळी मुग, उघड्यावर वाळविण्यास ठेवलेली हळद व इत्यादी पिकाचा शेतमाल पावसाच्या संपर्कात येऊ नये याची दक्षता घ्यावी. शेतमाल प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • वादळी वारा व पावसाचा अंदाज लक्षात घेता कृषी रसायने फवारणी आणि उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील ३ ते ४ दिवस पुढे ढकलावी. • वाढत्या तापमानाचा अंदाज लक्षात घेता, शेतीमधील महत्वाची कामे हि सकाळी ११ वाजता पूर्वी करण्यास प्राधान्य द्यावे. • वादळी वारा व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. • शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. • कृषी उत्पन्न बाजार समिती व खासगी शेतमाल खरेदी धारकांनी शेतकरी बांधवांद्वारा खरेदीसाठी आणलेला शेतमाल उघड्यावर न साठवता शेड मध्ये साठवावा. • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य भाजीपाला व फळांची काढणी करून विक्री करावी. फळबागांना बांबू च्या सहाय्याने आधार द्यावा. • एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी पिक काढणी नंतर शेताची नांगरणी करावी. • माती परीक्षण केले नसल्यास शास्त्रीय पद्धतिने नमून घेऊन कृषी विद्यापीठ, शासकीय किंवा अधिकृत माती परीक्षण प्रयोगशाळेत नमुने पाठवून

| |
|---|
| माती परीक्षण करून घ्यावे. • उन्हाळी भाजीपाला पिकाचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी ग्रीन शेड नेट चा वापर करावा. |

### संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| • कृषी उत्पन्न बाजार समिती व खासगी शेतमाल खरेदी धारकांनी शेतकरी बांधवांद्वारा खरेदीसाठी आणलेला शेतमाल उघड्यावर न साठवता शेड मध्ये साठवावा. |

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | • भुईमुग पिकाला शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये पाण्याच्या ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. शक्य असल्यास ओलीत करण्याकरिता तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा. • उन्हाळी भुईमुग पिकाची काढणी व मळणी करून घेण्यास प्राधान्य द्यावे. |

### फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • वादळी वारा, गारपीट व पावसाचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी तसेच फळ झाडांना बांबूच्या साहाय्याने आधार द्यावा. • तापमानातील वाढ लक्षात घेता शेतातील गवत, तणस, गव्हांडा, कुटार असल्यास झाडाभोवती ५ ते १० सेमी. थर देऊन आच्छादन द्यावे, यामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते व जमिनीत ओलावा टिकून राहतो आणि आंबिया बहराची फळगळ कमी होण्यास मदत होते. • या काळात पाण्याच्या ताणामुळे कोळी किडीची समस्या अधिकच वाढते. विशेषतः उन्हाळ्याच्या उतरार्धात ताणात झाडांना चांगले ओलीत करावे. • डायकोफॉल* १८.५ ईसी २७ मिली किंवा प्रोपारगाईट* ५७ ईसी २० मिली किंवा इथिओन* ५० ईसी २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसाच्या अंतराने दोन वेळा पाण्याच्या ताण बसला असल्यास लगेच फवारणी करावी. • एप्रिल महिन्यात काळ्या माशीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी १५ दिवसाच्या अंतराने इमिडाक्लोप्रीड# १७.८ एसएल ५ मिली प्रती १० लिटर पाणी किंवा डायमिथोएट# ३० ईसी २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या संपूर्ण पानांचा अंतर्भाव होईल अशा रीतीने फवारणी करावी जेणेकरून काळी माशी प्रौढ निघणे आणि ५० % अंड्यातून पिल्ले निघण्याच्या अवस्थेत या किडीचे प्रभावी पणे नियंत्रण होण्यास मदत होईल. • फळ गळ व्यवस्थापनासाठी जिब्रेलिक आम्ल १.५ ग्राम आणि युरिया १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे आंबिया बहार चांगला येण्यास मदत होते. (जिब्रेलिक आम्ल पाण्यात मिसळण्या पूर्वी १० मिली अल्कोहोल मध्ये मिसळावे). • तापमानातील वाढ लक्षात घेता २-४ डी १.५ ग्राम आणि पोटाशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फळ बागांमध्ये प्रौढ अवस्थेतील रस शोषक किडीच्या व्यवस्थापनासाठी ३० पिवळे चिकट सापळे (३० x ४० सेंमी आकाराचे व आठवड्याच्या अंतराने स्टीकर म्हणून एरंडी तेलाचा वापर करावा) प्रती एकर १.५ ते २ मीटर जमिनीपासून उंचीवर लावावे. • डिंक्या प्रभावित भागाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आतील भागास इजा होणार नाही याची काळजी घेऊन डिंक बाहेर पडतो भाग धारधार चाकूने किंवा पटाशीने खरडून त्या भागावर मेफेनोक्झाम* एमझेड ६८ (५० ग्राम) किंवा फोसेटील एएल (५० ग्राम) १ लिटर पाण्यात मिसळून पेस्ट तयार करून प्रादुर्भाव ग्रस्त भागावर लावावी. ३० दिवसाच्या अंतराने पुन्हा हि पेस्ट लावावी. |
| कोबी | • पावसाचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्यकोबीव फुल कोबीच्या गड्ड्याची काढणी करून विक्री करावी. • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी १३ मिली किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील चौकोनी ठीपक्याच्या पतंग कीड व्यवस्थापनासाठी, क्लोरपायरीफॉस २० ईसी ४० मिली किंवा स्पिनोसॅड २.५ एससी १२ मिली किंवा फेनवलेरेट २० ईसी ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| टोमॅटो | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता फळांची गळ व होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावीव झाडांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • सततच्या ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकावर उशिरा |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | येणाऱ्या करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामन परिस्थिती असताना कॉपर ऑक्सिक्लोराईड (३.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा बोर्डो मिश्रण (१ %) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लि.) किंवा फोसेटील एएल ( ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा डायमिथोमोर्फ (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा पुर्वमिश्रित बुरशीनाशक पायराक्लोस्ट्रोबिन + मेटीराम (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेफेनोक्झाम + कॉपर ऑक्सिक्लोराईड (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेटालीक्सील ८ % + मॅन्कोझेब ६४ % (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) या प्रमाणातफवारणी करावी. |
| मिरची | • वाढलेले तापमान व ढगाळ हवामान लक्षात घेता, मिरची पिकामध्ये फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मी.ली., प्रती ९ लिटर पाण्यात मिसळून मिरची लागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी. • सद्यपरिस्थितीत मिरची पिकावरील रसशोषक किडीच्या नियंत्रणाकरिता, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| टरबूज | • पावसाचा अंदाज लक्षात घेता,बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावी. |
| खरबूज | • पावसाचा अंदाज लक्षात घेता, बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • वादळी वारा व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. • जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. |
| गाय | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. बैल व इतर जनावरांकडून सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजेदरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. चरण्यासाठी सकाळी किंवा संध्याकळी सोडावे. |
| गाय | • दुभत्या गाईस ८ किलो वाळलेला चारा आणि ६ किलो हिरवा चारा आणि १ किलो खुराक द्यावा. खुराक मिश्रण करतांना मका, ज्वारी, बाजरी, गव्हाचा कोंडा, यांचा वापर करावा. खुराकात २० ग्राम प्रती किलो खनिज मिश्रण मिसळावे. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • कोंबड्यांच्या शेड ला कापडी पडदे लावावे तसेच हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| **इतर (माती / जमीन तयार करणे)** | **इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला** |
|---|---|
| माती चाचणी | • रब्बी पिके काढलेल्या शेताची त्वरित नांगरणी करावी, यामुळे जमीन तापण्यास मदत होऊन किडीचे कोष व घातक बुरशीचा नायनाट होण्यास मदत होईल व पेरणीसाठी जमिनीची मशागत चांगली होईल. माती परीक्षणासाठी मातीचे नमुने काढून ते अधिकृत किंवा शासकीय मृदा परीक्षण प्रयोगशाळेत योग्य शुल्कासह पाठवून माती परीक्षण अहवालानुसार पिक परत्वे कृषी निविष्ठा चे नियोजन करावे. |